# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क. ६६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०९/२०१७

**१) एटीएम मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २२/०९/२०१७ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी विजय जयराम फुंडे वय ५६ वर्ष रा. नगर पंचायत कार्यालयाचे मागे प्रभाग नं. ०१ लाखनी हे बॅक ऑफ ईडीया चे एटीएम मध्ये बॅलेन्स चेक करण्या करीता गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने एटीएम कार्ड बदली करुन त्या व्द्रारे फिर्यादीचे खात्यातुन २५,०००/—रु.काढुन फिर्यादीची फसवणुक केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भांदवि. सहकलम ६६ (क) माहिती तंत्रज्ञान कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. तेलुरे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) पैसे मागण्याचे कारणावरून भांडण करून दगडाने डोळया जवळ मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/०९/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील आरोपीची आई फिर्यादीची सासु मायाबाई उर्फ शांताबाई हजारे हिने फिर्यादीची संगातीन सौ. मोनाली हिच्या जवळ ठेवलेले ४,०००/—रु. पैकी १,०००/—रु. मागीत असतांना फिर्यादी व सासु सोबत भांडण होवुन शिवीगाळ देत असतांनी, त्या भांडणावरुन फिर्यादीच्या पतीला मारण्यास जात असता फिर्यादी ही आडवी झाली असता आरोपीने हातातील दगड फिर्यादीचे डावे डोळया जवळ मारुन जखमी केल्याने व पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. सरीता उमेश हजारे वय २३ वर्ष, रा. आमगाव दिघोरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) मुर्तीची विटंबना केल्याने गुन्हा नोंद;—**

दिनांक २२/०९/२०१७ चे ०६.१० वाजता दरम्यान यातील हनुमान मंदीरातील हनुमान मुर्तीवर व मुकुटावर कोणीतरी अज्ञात आरोपीने विष्ठा लावुन, मुर्तीची विंटबना केल्याने ,फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २९५ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कोयंडे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**४) लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद ;—**

दिनांक २२/०९/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यतील वाहन आमरोडवर व येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. साबळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. गजभिये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत .

**५) अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :-**

दिनांक २२/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर,सिहोरा गोबरवाही, अडयाळ, लाखांदुर, भंडारा व वरठी येथे अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून ६५ लिटर हा.भ. दारू किंमती ४,२५०/-रु, व १ लिटर २६० मिली लिटर देशी दारु किंमती ४४८/-रु. तसेच जुगारातुन किमती ३०५०/रु असा एकुण किंमती ७,७४८/-रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता